गुरुवार, दि. ०१ डिसेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १२६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

आमचे वाचक, जाहीरातदार, हितचिंतकांना नववर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा
युवा आदर्श
https://epaper.yuvaadarsh.com
वर्ष बदलतंय
वृत्तपत्र नाही...
२०२६

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# दर्पण दिन (दि ६ जानेवारी)



## सन्मान पत्रकारितेचा
## सत्कार पत्रकारांचा

ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार, उदयोन्मुख पत्रकार-संपादकांचा सत्कार,
सर्व पत्रकार - जाहिरात प्रतिनिधी, प्रेस फोटोग्राफर, यांचा सत्कार,
डिटीपी ऑपरेटर वृतपत्र विक्रेते, एजन्सीधारक, पेपर वाटप करणाऱ्यांचा सत्कार

## दै. त्रिकाल संघर्षचे लोकार्पण

**स्थळ : भारती लॉन्स, राजुर रोड, जालना**
**मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६**

आयोजक

**दीपक शेळके, बाबासाहेब आटोळे, दर्पण सकलेचा, गणेश काबरा, आमेर खान, सुहास वैद्य, प्रा. दत्ता देशमुख, शेख अशफाक, बाबुजी तिवारी, शेख चांद पी.जे., बाबासाहेब कोलते, सुनील भारती, शाहरुख शेख, आशिष तिवारी, प्रदीप देशमुख, जीवन काळे, माणिक जैस्वाल, योगेश देशमुख, दिनेश नंद, योगेश काकफळे, सुनील नरवडे, शेख मुजीबुद्दीन, निकीता काळे, शेख महेजबीन.**

मार्गदर्शक - अंकुशराव देशमुख, विजयकुमार सकलेचा, विनायक दहातोंडे, रवींद्र बांगड, महेश जोशी, लक्ष्मण राऊत, गुलाब पाटील, संजय भरतीया, बद्रीनाथ टेकाळे.

## संपादकीय

# वाहनांवर नियंत्रण आणायला हवे

पुण्यात वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर असताना देखील खाजगी वाहन विक्रीत प्रत्येक वर्षी वाढ होत आहे. यंदा पुण्यात उच्चांकी सव्वातीन लाखांपेक्षा जास्त खाजगी वाहनांची विक्री झाल्याची नोंदणी प्रादेशिक परिवहन विभागाकडे ( आरटीओ ) झाली आहे. त्यामध्ये दुचाकी खरेदीमध्ये वाढ झाली असून पुण्यात दोन लाखांपेक्षा अधिक दुचाकींची खरेदी केल्याचे आढळून आले आहे. आधीच पुणे शहरात वाहनांची संख्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. त्यात या सव्वातीन लाख वाहनांची भार पडली आहे. पुणे शहरात सध्या ४१ लाखांहून अधिक वाहने आहेत. केवळ पुणे शहरातच एका वर्षात सव्वातीन लाखांपेक्षा अधिक वाहनांची खरेदी झाली याचाच अर्थ राज्यातील इतर शहरातही वाहनांच्या खरेदीने उच्चांक केला आहे. पुण्यापेक्षा मुंबई, ठाणे या शहरात अधिक वाहनांची खरेदी झाल्याची शक्यता आहे. प्रत्येक शहरात साधारणपणे तीन लाख वाहनांची खरेदी झाल्याचे गृहीत धरले तरी हा आकडा खूप मोठा होतो. पुण्याप्रमाणेच मुंबई शहरातही वाहनांची संख्या अधिक आहे. मुंबईत चार चाकी आणि दुचाकी वाहनांची संख्या ५० लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहेत. शिवाय पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. पुण्यातही तीच परिस्थिती आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या वाहनांमुळे मुंबई, पुण्यातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण याची ना कोणाला फिकीर ना खंत. एकेकाळी पुणे शहर हे सायकलींचे शहर म्हणून ओळखले जायचे ती ओळख आता पुसली गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी कमालीची वाढली आहे. प्रदूषणामुळे दिल्लीची काय अवस्था झाली आहे ते आपण पाहतोच आहे, दिल्ली प्रमाणेच इतर शहरांची अवस्था व्हायला नको असेल तर वाहनांवर नियंत्रण आणायला हवे. वाढत्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीचाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. वाहतूक कोंडीमुळे पुणेकर त्रस्त आहेत. रस्त्यावर वाहनांच्या रांगांच्या रांगा लागलेल्या असतात. नागरिकांनी नवीन वाहने विकत घेण्यापेक्षा बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर नागरिकांनी करायला हवा पण नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर विश्वास नाही. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे. म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. पुण्या - मुंबई सारख्या शहरातील वाहनांची संख्या कमी करायची असेल तर बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना योग्य सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्यास पुण्या - मुंबईतील वाहनांच्या संख्येवर नियंत्रण येईल यात शंका नाही.

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

---

### मुख्य निवडणूक निरीक्षक जगदीश मिनीयार यांनी घेतला महानगरपालिका निवडणुकीचा आढावा

# संवेदनशील मतदान केंद्रावर विशेष लक्ष ठेवा

### मुख्य निवडणूक निरीक्षक जगदीश मिनीयार; महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर महापालिका निवडणुकीसाठी दि. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. तरी मतदान प्रक्रिया निर्भय व शांततेत पार पाडण्यासाठी संवेदनशील मतदान केंद्रावर विशेष लक्ष ठेवावे, असे प्रतिपादन मुख्य निवडणूक निरीक्षक जगदीश मिनीयार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, सहाय्यक निवडणूक निरीक्षक हरीश धार्मिक, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि नोडल अधिकारी यांची उपस्थिती होती.

निवडणूक कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या आणि त्यांच्या प्रशिक्षणाबाबत माहिती जाणून घेऊन मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत होण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज राहतील याची दक्षता घेण्याबाबतची सूचना केली. शहरातील मतदान केंद्रावरील व्यवस्था, संवेदनशील मतदान केंद्रावरील व्यवस्था, दिव्यांग मतदारांसाठी व्यवस्था, पाणी, वीज व रॅम्पची व्यवस्था इत्यादी बाबीबरोबरच शस्त्र जमा केल्याचा आढावा यावेळी घेण्यात आला. जमा न झालेली सर्व शस्त्रास्त्रे जमा करून घेण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

मतदान यंत्र आणि मतदानासाठी यंत्रांची सज्जता याविषयी आढावा घेऊन मतदानानंतर सर्व मतदान यंत्रे जमा करण्याचे व त्याची सुरक्षितता याबाबतही विविध सूचना दिल्या. अवैध दारू विशेषतः निवडणूक काळात अवैध मद्य वाहतूक आणि साठा रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने कडक प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना श्री. मिनीयार यांनी यावेळी दिल्या.



जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी उमेदवारांना तात्पुरते प्रचार कार्यालय, रॅली, प्रचार सभा, उपसभा, मिरवणूक, वाहन, लाऊड स्पीकर, झेंडे, बॅनर, पोस्टर्स, ड्रोन कॅमेरे आदीच्या परवानगीसाठी एक खिडकी परवानगी कक्ष महानगरपालिकेत सुरू करण्यात आलेला आहे. आदर्श आचारसंहिता कक्षाचा टोल फ्री क्रमांक ०२४८२ २२३१३२ असा आहे. तसेच आचारसंहिता कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेला आहे. विविध भरारी पथकांची स्थापना, मनुष्यबळ, वाहने, चेकपोस्ट, भरारी पथके, प्रतिबंधात्मक कार्यवाही, साहित्य व्यवस्थापन, स्वीप अंतर्गत मतदानाविषयी करण्यात आलेली जनजागृती तसेच आतापर्यंत करण्यात आलेली कार्यवाही आदीची माहिती जिल्हाधिकारी तथा महापालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे यावेळी दिली.

---

### जालना पोलिसांची धडाकेबाज कारवाई

# दोन गावठी कट्टे आणि ११ जिवंत काडतुसांसह दोन तरुण जेरबंद!

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील सदर बाजार पोलिसांनी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी जोरदार मोहीम उघडली आहे. एका धाडसी कारवाईत पोलिसांनी दोन गावठी कट्टे (अग्निशस्त्र) आणि ११ जिवंत काडतुसांचा मोठा साठा जप्त केला असून, या प्रकरणी दोन तरुणांना बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईमुळे अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

**नेमकी घटना काय?**

दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप आणि त्यांच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली होती. कादराबाद भागातील विक्की विर नावाचा तरुण कमरेला पिस्तूल लावून फिरत असल्याची माहिती मिळताच, पोलिसांनी अलंकार टॉकीज परिसरात सापळा रचला. दुपारी १:३० च्या सुमारास विक्कीला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे एक गावठी कट्टा आढळून आला.

**तपासातून फुटले मोठे धागेदोरे**

विक्कीची कसून चौकशी केली असता त्याने हे शस्त्र विक्रम कुलथे (रा. राजपूतवाडी, जालना) याच्याकडून घेतल्याचे कबूल केले. पोलिसांनी तत्काळ मयूरी पार्क, सामनगाव रोड परिसरातून विक्रम कुलथेला ताब्यात घेतले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या विक्रमने अखेर पोलिसांसमोर पोपटासारखी माहिती दिली. त्याने सांगितले की, आणखी एक गावठी कट्टा आणि जिवंत काडतुसे त्याने एका झाडाखाली खड्डा करून लपवून ठेवली आहेत.

पोलिसांनी घटनास्थळी जाऊन शोध घेतला असता, तेथे दोन गावठी कट्टे आणि ११ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली. या गुन्ह्यात विक्की विर आणि विक्रम कुलथे या दोघांना अटक करण्यात आली असून, त्यांचा तिसरा साथीदार शिवम राजपूत हा सध्या फरार आहे. पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत.



ही धडाकेबाज कामगिरी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप भारती, पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप व त्यांच्या पथकातील कर्मचारी रामप्रसाद रंगे, नजीर पटेल, जगन्नाथ जाधव, अजीम शेख, दुर्गेश गोफणे व इतर सहकाऱ्यांनी केली आहे. शहरात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अशा गुन्हेगारांची माहिती असल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे, माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल.

---

### जालना जिल्हा रुग्णालयातील रस्त्यावर बेशिस्त पार्किंगचा कहर

# मोटारसायकलींच्या गर्दीमुळे रुग्णवाहिकांना अडथळा

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासह अंतर्गत रस्त्यांवर बेशिस्तपणे उभ्या केलेल्या मोटारसायकलींमुळे रुग्णवाहिका (अँम्ब्युलन्स) सेवा मोठ्या अडचणीत सापडली आहे. अत्यावश्यक वैद्यकीय सेवा देणाऱ्या या रुग्णालयाच्या परिसरात शिस्तबद्ध पार्किंगचा अभाव दिसून येत असून, त्यामुळे गंभीर रुग्णांच्या जीविताला धोका निर्माण होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

जिल्हा रुग्णालयात दररोज शेकडो रुग्ण उपचारासाठी येतात. अपघातग्रस्त, गरोदर महिला, गंभीर आजारी रुग्ण यांना घेऊन येणाऱ्या अँम्ब्युलन्सना रस्त्यावर आडव्या, तिरक्या आणि गर्दीने उभ्या असलेल्या दुचाकींमुळे मार्ग काढणे कठीण होते. अनेक वेळा रुग्णवाहिकांना काही मिनिटे थांबावे लागत असल्याचे चित्र आहे. वैद्यकीय उपचारात काही मिनिटांचा विलंबही जीवघेणा ठरू शकतो, मात्र याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

बेशिस्त पार्किंगमुळे केवळ अँम्ब्युलन्सच नव्हे तर रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांनाही मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोरच मोटारसायकलींची गर्दी असल्याने पायी चालणाऱ्या रुग्णांना आणि ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित मार्ग मिळत नाही. रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचारी यांनाही वेळेत कामावर पोहोचताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रुग्णालय परिसरात सुरक्षा रक्षक असतानाही पार्किंगवर कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसून येते. रुग्णालय प्रशासनाने निश्चित केलेली पार्किंग व्यवस्था कागदावरच असल्याचा आरोप केला जात आहे. काही वाहनधारक तर थेट अँम्ब्युलन्स मार्गातच दुचाकी उभी करत असल्याचे चित्र रोज पाहायला मिळत आहे. या प्रकाराबाबत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करताना



नागरिकांनी सांगितले की, जिल्हा रुग्णालयासारख्या संवेदनशील ठिकाणी जर शिस्त पाळली जात नसेल तर इतर ठिकाणांची काय अवस्था असेल? बेशिस्त पार्किंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई, स्वतंत्र पार्किंग झोन, अँम्ब्युलन्ससाठी मोकळा मार्ग, तसेच पोलीस व महापालिकेच्या संयुक्त कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

रुग्णालय परिसरात नो-पार्किंग झोन स्पष्टपणे चिन्हांकित करणे, अँम्ब्युलन्स मार्ग कायम मोकळा ठेवणे, सुरक्षा रक्षकांना स्पष्ट सूचना देणे आणि वाहतूक पोलिसांच्या मदतीने नियमित कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत नागरिक आणि रुग्णांच्या नातेवाईकांनी व्यक्त केले आहे. जालना जिल्हा रुग्णालयात बेशिस्त पार्किंगमुळे निर्माण झालेली ही परिस्थिती केवळ गैरसोयीची नसून, ती थेट रुग्णांच्या जीवाशी संबंधित गंभीर समस्या बनत चालली आहे. प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने ठोस पावले उचलणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

### आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्गदर्शक सागर अग्रावत यांच्या मार्गदर्शन शिबीराचे आयोजन

# जिल्हातील शेतकरी, महिला बचत गट व ग्रामीण भागातील महिला व तरुणांनी या शिबीरात सहभाग नोंदवावा- जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील शेतकरी, महिला बचत गट, व्यापारी, MSME उद्योजक व युवकांना जागतिक बाजारपेठेतील संधींची ओळख करून देण्यासोबतच जिल्हातील आयात निर्यातीला चालना मिळावी व जागतिक परिप्रेक्ष्यातील बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्गदर्शक सागर अग्रावत यांच्या विशेष मार्गदर्शन शिबीराचे आयोजन दि. ३ जानेवारी २०२६ शनिवार रोजी सकाळी १०:३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात करण्यातआल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.

सदरील कार्यक्रम जिल्हा प्रशासन, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॅजिक आयटीआय इन्युबेशन सेंटर जालना यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून होरायझन एक्सिम या कंपनीचे संस्थापक व संचालक सागर अग्रावत हे मार्गदर्शन करणार आहेत. ते आंतरराष्ट्रीय निर्यातदार म्हणून जागतिक स्तरावर काम करतात त्यांनी आजपर्यंत २० पेक्षा अधिक देशांमध्ये निर्यातीचा अनुभव असून, जगभरातील ५० हजाराहून अधिक निर्यातदारांना मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित मार्गदर्शनामुळे स्थानिक स्तरावरील उद्योजकांना निर्यात क्षेत्रात आत्मविश्वासाने पाऊल टाकण्याची दिशा मिळणार आहे.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जालना जिल्ह्यातील शेतकरी, व्यापारी, चड्वए उद्योजक व युवकांना निर्यात क्षेत्रातील संधींबाबत जनजागृती करणे तसेच स्थानिक उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कशी पोहोचवता येतील, याबाबत योग्य व व्यवहार्य मार्गदर्शन करणे हा आहे. या कार्यक्रमात जालना जिल्ह्यातून उपलब्ध असलेल्या निर्यात संधी, स्थानिक कृषी व औद्योगिक उत्पादने जागतिक बाजारपेठेत कशी पोहोचवायची,प्रत्यक्ष निर्यात प्रवासातील अनुभव, अडचणी व त्यावरील उपाय, प्रथमच निर्यात करू इच्छिणाऱ्यांसाठी सोपे, व्यवहार्य व परिणामकारक मार्गदर्शन मिळणार आहे.

निर्यात ही केवळ मोठ्या शहरांसाठीच नाही,लहान जिल्ह्यांतूनही जागतिक यशाची सुरुवात होऊ शकते!हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात येणार असून, जालना जिल्ह्यातील युवक व उद्योजकांसाठी हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरणार आहे.या उपक्रमामुळे स्थानिक उत्पादकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्याची नवी दारे खुली होणार असून, जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळणार असल्याने या कार्यक्रमासाठी जिल्हातील शेतकरी, महिला बचत गट, व्यापारी, चड्वए उद्योजक व ग्रामीण भागातील महिला व युवकांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

या कार्यक्रमासाठी सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी कौशल्य विकास विभागामार्फत तयार करण्यात आलेला https://forms.gle/uX1E9P26bkBeVUtU हा गुगल अर्ज भरावा किंवा ९५३६४२७७७७ (कैलास काळे) या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

# जालना मनपा निवडणूक : गेल्या वीस वर्षात ‘तारा-सितारा’ने शहराची वाट लावली; हिशोब द्यावा लागेल

## एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख माजेद यांचा खोतकर-गोरंट्याल जोडीवर गंभीर आरोप; सत्ताधाऱ्यांच्या गोटात अस्वस्थता

**जालना । विशेष प्रतिनिधी** - जालना महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत आता प्रत्यक्ष प्रचारासोबतच राजकीय शब्दयुद्धाला तीव्र धार आली असून, एमआयएम चे जिल्हाध्यक्ष शेख माजेद यांनी विद्यमान आमदार अर्जुन खोतकर आणि माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर जोरदार, आक्रमक आणि थेट हल्लाबोल केला आहे. नाव न घेता या दोन्ही नेत्यांचा उल्लेख करत त्यांनी त्यांना ‘तारा-सितारा’ जोडी असे संबोधले असून, या जोडीने गेल्या २० वर्षांत जालना शहराची अक्षरशः वाट लावली आहे, असा स्फोटक आरोप त्यांनी केला आहे.

**शब्दयुद्धाची ठिणगी - प्रचाराला वेग**

मनपा निवडणूक जाहीर होताच जालना शहरातील राजकारण तापले असून, शेख माजेद यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे प्रचारात एक नवा वळणबिंदू निर्माण झाला आहे. एमआयएमने यावेळी कोणत्याही पक्षाशी युती न करता ‘एकला चलो रे’ ची भूमिका घेत स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्धार केला आहे. तब्बल १७ प्रभागांत उमेदवार उभे करत पक्षाने प्रचाराचे रणशिंग फुंकले असून, खुद्द जिल्हाध्यक्ष शेख माजेद हेही नगरसेवक पदासाठी निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

**२० वर्षे सत्ता, पण शहरासाठी शून्य - माजेदांचा आरोप**

शेख माजेद यांनी सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका करताना सांगितले की, जालना शहरात विकासाच्या केवळ पोकळ घोषणा करण्यात आल्या. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता, आरोग्य सुविधा यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर नागरिकांना वाऱ्यावर सोडण्यात आले. दोन दशकं सत्तेत राहूनही या तथाकथित नेत्यांनी शहराला काहीच दिलं नाही. फक्त स्वतःच्या राजकारणाची पोळी भाजली. या विधानामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, एमआयएमने थेट सत्ताधाऱ्यांच्या अपयशावर बोट ठेवण्याची रणनीती स्वीकारल्याचे स्पष्ट झाले आहे.

**एमआयएमची रणनीती : नाराज मतदारांवर लक्ष**

राजकीय विश्लेषकांच्या मते, एमआयएमची सध्याची भूमिका ही शहरातील प्रस्थापित नेत्यांविषयी वाढलेल्या नाराजीवर आधारित आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांचा प्रश्न कायम असून, नागरिकांमध्ये असंतोष आहे. हाच असंतोष एमआयएम आपल्या पथ्यावर पाडण्याचा प्रयत्न करत असल्याचे चित्र आहे. १७ उमेदवार उभे करणे म्हणजे एमआयएमने केवळ उपस्थिती दाखवण्यापुरते मर्यादित न राहता, सत्तेच्या गणितात हस्तक्षेप करण्याची तयारी केली असल्याचे संकेत मिळत आहेत.

**‘तारा-सितारा’ प्रहार : प्रतिमा युद्धाला धार**

‘तारा-सितारा’ असा शब्दप्रयोग करत शेख माजेद यांनी थेट दोन दिग्गज नेत्यांच्या प्रतिमेवर हल्ला चढवला आहे. हा प्रहार केवळ टीकेपुरता मर्यादित नसून, मतदारांच्या मनात गेल्या २०



वर्षांच्या राजकारणाचा हिशेब मागणारा आहे. यावेळी जनता या जोडीला घरचा रस्ता दाखवेल, असा ठाम दावा करत माजेद यांनी मतदारांना थेट साद घातली.

**सत्ता गणिते बदलणार?**

जालना शहरात एमआयएमची वाढती ताकद, आक्रमक प्रचार, आणि थेट सत्ताधाऱ्यांवर केलेली टीका पाहता, महापालिकेतील सत्ता समीकरणे बदलण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. विशेषतः अल्पसंख्याक मतदारांसह नाराज सर्वसामान्य नागरिक एमआयएमकडे वळतात का, हे निर्णायक ठरणार आहे.

**प्रस्थापित नेत्यांविषयीची नाराजी एमआयएमच्या पथ्यावर पडणार का?**

शेख माजेद यांचा हा ‘तारा-सितारा’ हल्लाबोल मतदारांच्या मनावर किती खोल परिणाम करणार? आणि १७ उमेदवारांच्या रणनीतीमुळे मनपेत सत्ताधाऱ्यांना धक्का बसणार का? याची उत्तरे येत्या निवडणुकीतच मिळणार असून, जालना मनपा निवडणूक आता फक्त लढत नव्हे, तर जनतेकडून कामगिरीचा निकाल देणारी ठरणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

---

# रोटरी क्लबतर्फे सूक्ष्म, लघु व मध्यम महिला उद्योजिकांसाठी आर्थिक साक्षरता शिबिर

**जालना । प्रतिनिधी** - रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे सूक्ष्म, लघु व मध्यम महिला उद्योजिकांसाठी रामनगर येथे २६ ते २७ डिसेंबरदरम्यान आयोजित दोन दिवशीय आर्थिक साक्षरता शिबिरात १०० महिलांनी सहभाग नोंदविला. मुंबई येथील श्रीमती पौर्णिमा शिरसकर, श्रीमती सीमा देसाई -नायर, श्रीमती सुमन पारेख या तज्ञ मार्गदर्शकांनी यावेळी मार्गदर्शन केले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी रामनगर ग्रामपंचायतचे सरपंच गोपाल मोरे, रोटरी क्लबच्या अध्यक्ष वर्षा वर्षा पित्ती, सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, महिला सबलीकरणाच्या संचालिका अर्चना देशपांडे, सुनीती मदान यांच्यासह उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, रामनगर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष उपस्थित होते.

महिलांची उद्योजकतेसाठी असणारी मानसिकता, व्यवसाय उत्पादनासाठी लागणारे भौगोलिक क्षेत्र, तज्ञ मार्गदर्शन, अर्थसहाय्य उपलब्धता, व्यापारपेठ, विविध शासकीय योजना, अनुदान आदी विषयांवर उपस्थित महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरात सहभागी सर्व महिलांना महाराष्ट्र शासन द्वारा एमएसएमई प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या प्रमाणपत्रद्वारे शासकीय योजनांचा लाभ त्यांना मिळणार आहे. वैविध्यपूर्ण शिबिरामुळे शिबिरार्थी महिलांनी समाधान व्यक्त केले. लवकरच त्यांना मुंबई येथे जाण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्प प्रमुख किशोर देशपांडे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार प्रकल्प प्रमुख सचिन वाणी यांनी मानले.




---

# बालविवाह निर्मुलनासाठी प्रतिज्ञा घेण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी** - शासनाकडून बालविवाह मुक्त भारत पोर्टल सुरु करण्यात आले असून हे सर्व नागरिकांसाठी खुले आहे. तरी बालविवाह मुक्त भारत पोर्टलवर जाऊन https://stopchildmarriage.wcd.gov.in या लिंकवर क्लिक करुन बालविवाह निर्मुलनाची प्रतिज्ञा घ्यावी व प्रतिज्ञा घेतल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन या मोहिमेमध्ये नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी.एम. यांनी केले आहे. जिल्ह्यात दि.१६ ऑक्टोबर २०२५ ते दि.२६ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये बालविवाह मुक्त भारत अभियान १०० दिवस जिल्हा महिला व बाल विकास विभागाकडुन राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जालना जिल्ह्यात बालविवाहाचे समुळ उच्चाटन व्हावे या अनुषंगाने प्रशासनाकडुन जनजागृती करण्यात येत आहे. बालविवाह थांबविण्याकरीता २४ तास १०९८ ही चाईल्ड हेल्पलाईन सेवा सुरु आहे. तसेच प्रशासनासोबतच प्रत्येक नागरिकांनी देखील बालक, बालिका यांचे शारीरिक, मानसिक आरोग्य तसेच बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी बाल विवाह होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. यासाठी सर्व स्तरावरुन सर्वांनी बालविवाह मुक्त भारत करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणुन बालविवाह मुक्त भारत पोर्टल सुरु करण्यात आले आहे.

---

# खोराड-सावंगी सर्कलमध्ये भाजपाचे नितीन राठोड विजयी ठरणार - अविनाश राठोड

**मंठा । योगेश राठोड** - खोराड-सावंगी सर्कलमध्ये होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणूक २०२६ बाबत राजकीय वातावरण तापू लागले असून, भारतीय जनता पक्षाचे उमेदवार नितीन राठोड यांचा विजय निश्चित असल्याचा विश्वास भाजप नेते अविनाश राठोड यांनी व्यक्त केला आहे.

अविनाश राठोड यांनी सांगितले की, नितीन राठोड यांनी मागील काळात सर्कलमधील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या समजून घेत विकासकामांना प्राधान्य दिले आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, शिक्षण व आरोग्य या मूलभूत सुविधांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून, त्यामुळे नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी सकारात्मक भावना निर्माण झाल्या आहेत.



तसेच भाजप सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यात नितीन राठोड यांची भूमिका महत्त्वाची राहिल्याचेही अविनाश राठोड यांनी नमूद केले. संघटनात्मक ताकद, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि मतदारांचा वाढता पाठिंबा पाहता, खोराड-सावंगी सर्कलमधून भाजपाचा विजय निश्चित असल्याचा दावा त्यांनी केला.

दरम्यान, या वक्तव्यामुळे खोराड-सावंगी सर्कलमधील राजकीय चर्चांना वेग आला असून, आगामी निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

# वंचित बहुजन आघाडीतर्फे उपेक्षित समाज घटकांना उमेदवारी - डेव्हिड घुमारे

**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीतर्फे उपेक्षित समाज घटकांना उमेदवारी देण्यात आली असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे यांनी दिली. याबाबत माहिती देतांना घुमारे म्हणाले की, वंचित बहुजन आघाडी हा वंचित- उपेक्षित समाजाला न्याय देणारा पक्ष आहे. उपेक्षित समाज घटक राजकारणात येवून त्यांना सत्तेत जाण्याची संधी मिळावी, यासाठी राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर हे सातत्याने प्रयत्न करीत आहेत. जालना महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने २२ उमेदवारांना उमेदवारी दिली आहे. हे सर्व उमेदवार उपेक्षित समाजाचे आहेत. शिवाय या उमेदवारात सर्व धर्मीयांचा समावेश आहे. कोणत्याही पक्षासोबत युती- आघाडी न करता वंचित बहुजन आघाडी जालना महानगर पालिकेची निवडणूक स्वबळावर लढणार आहे. जालना महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने विकास शामराव मोरे यांना प्रभाग क्रमांक.१ अ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच मनोज हरिकिशन शर्मा यांना प्रभाग क्रमांक २ ड मधून, निला गौत्तम काकडे यांना प्रभाग क्रमांक ४ अ मधून, गौत्तम गंगाधर काकडे यांना प्रभाग क्रमांक.४ड मधून, सुहासिनी पावलस कांबळे यांना प्रभाग क्रमांक ५ ब मधून, विनोद शामसन लोंढे यांना प्रभाग क्रमांक ५ ड मधून, रूखसानाबी सय्यद यांना प्रभाग क्रमांक १० क मधून, जहरा दिलावरखान यांना प्रभाग क्रमांक १० ब मधून, अशोक शंकरराव रत्नपारखे यांना प्रभाग क्रमांक १२ अ मधून, सत्यपाल शेषराव गायकवाड यांना प्रभाग क्रमांक१३ क मधून, मायाबाई वानखेडे यांना प्रभाग क्रमांक १३ ब मधून, विशाल काशीनाथ मगरे यांना प्रभाग क्रमांक १३ ड मधून, अंजुम बेग शेख जुनेद मनियार यांना प्रभाग क्रमांक१३ अ मधून, सरिता सचिन घोडे यांना प्रभाग क्रमांक १५ अ मधून, संगीता विलास भिंगारे यांना प्रभाग क्रमांक १५मधून, रंजीत विश्वनाथ रत्नपारखे यांना प्रभाग क्रमांक १५ ड मधून, अमोल विष्णू लोखंडे यांना प्रभाग क्रमांक १६ अ मधून, रमाबाई अरविंद होर्शिल यांना प्रभाग क्रमांक १६ क मधून, डॉ. दीपक शामराव भालेराव यांना प्रभाग क्रमांक१६ ड मधून तर सुवर्णा कायंदे यांना प्रभाग क्रमांक १६ ब मधून उमेदवारी देण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडी ही जालना महानगर पालिकेच्या निवडणुकीत चांगले यश मिळवेल,असा आशावादही घुमारे यांनी व्यक्त केला आहे.

---

# नववर्षाचे स्वागता बरोबरच करा संकल्प

२०२६ सालात आपण पदार्पण करित आहोत. गतवर्षाच्या अनेक गोड कडू आठवणी घेऊन पुढे जात असतो. नवीन वर्षात आपण प्रवेश करतो म्हणजे काय ? आपण तेच असतो. आजूबाजूची परिस्थिती तीच असते. फक्त एक जाणीव असते मनामध्ये.

कालनिर्णय, महालक्ष्मी,सनातन, दिनदर्शिका आणि अशा अनेक दिनदर्शिका बाजारात येतात त्या आणणे... तसेच नव्या वर्षाच्या रोजनिशी अर्थात डायऱ्या बाजारात आलेल्या आहेत. गेल्या बऱ्याच वर्षापासून मी गीता प्रेस गोरखपुर ची रोजनिशी-डायरी घेत असतो .आता ही ती आणली आहे. काही वर्षांपूर्वी खूप प्रकारची शुभेच्छा कार्डही विक्रीला येत होती. आताही येतात परंतु त्याच एवढे आकर्षण राहिलेलै नाही.आता व्हाट्सअप,इंस्टाग्राम

आणि फेसबुक वगैरे मुळे नववर्ष शुभेच्छा कार्ड पाठवण्याची पद्धत जवळपास बंदच झाली आहे. त्याऐवजी व्हाट्सअप वर शुभेच्छा दिल्या जातात.

नवीन वर्षात निरनिराळे वैयक्तिक आणि सामाजिक विषय समोर ठेवून संकल्प केले जात असतात.

खरंतर नवीन वर्षाचे संकल्प करण्यापूर्वी गतवर्षात आपण काय ठरवले होते, काय संकल्प केले होते, ते कितपत पूर्ण झाले याचा विचार करणे हे तेवढेच आवश्यक आहे. त्यामुळे नवीन वर्षाच्या वळणावर आपण काय करायला हवे ते ठरविता येते.

संकल्प म्हणजे काय तर आपणच आपल्याला दिलेले जे वचन असते. आणि आपण जर स्वतः दिलेले वचन जर पाळू शकत नसलो तर दुसऱ्याला दिलेले वचन कसे पाळणार ? तेव्हा आपण म्हणतो ना वचनाला जागला तर... त्यात याच गोष्टीचा अंतर्भाव असतो, आणि त्यातून एखादी गोष्ट ठरवून कोणाला काही देणे ह्यात आपण आपला सकारात्मक बदल किंवा सकारात्मक विचार पुढे नेऊ शकतो..

नवीन वर्षात आपण अनेकविध संकल्प करू शकतो. त्यात आपण काही वैयक्तिक स्वरूपात गोष्टी करायचे ठरवतो तर काही सामाजिक देणे.देणे समाजाचे म्हणून ते करायचे असतात.

वैयक्तिक संकल्पा मध्ये मध्ये वाचनाचा संकल्प करणे, लिखाणाचा संकल्प करणे, भेट वस्तू देतांना एखादे चांगले पुस्तक भेट द्यावे.दरमहा एक पुस्तक वाचण्याचा संकल्प, आरोग्य विषयी काही काळजी घेणे, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे, व्यसनापासून दूर राहणे,

सामाजिक गोष्टी मध्ये पर्यावरण, प्रदूषण, वृक्ष लागवड, स्वयंसेवी संस्थांना मदत करणे, आपल्या घरात आपण टाकून दिलेली आहे परंतु वापरण्याजोगी कपडे असल्यास ते त्या त्या संस्थाला देणे, गरजूंना मदत करणे एखाद्या वाचनालयाला पुस्तकांची भेट देणे.

सामाजिक कार्यात किंवा आपण सर्वांशी निगडित एखादा संकल्प करतो त्यावेळेला आपण केलेल्या संकल्प हा इतरांसाठी महत्त्वाचा आहे ,जसा जो तो आपल्यासाठी आहे आणि आपणच जर त्याचे उल्लंघन केलं तर त्यापासून आपल्या होणाऱ्या नुकसाना बरोबरच इतर अनेकांची नुकसान होऊ शकते त्यामुळे ही जाणीव मनामध्ये प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे आणि अशी जाणीव जर आपल्या मनात निर्माण झाली तरच आपण केलेले संकल्प पुर्णत्वास नेऊ शकतो. जसे आपल्याकडून जर प्रदूषण आणि पर्यावरणाची हानी होत असेल तर ती आपल्याला जर त्रासदायक आहे पण त्याचबरोबर त्यामुळे असंख्य लोकांना त्यापासून उपद्रव होऊ शकतो त्यामुळेच ही जाणीव महत्त्वाची आहे.

आपली प्रतिष्ठा ही सुद्धा संकल्प करताना महत्वाची असते. म्हणजे जसे संकल्प करताना आपले समाजातले स्थान, मित्र मंडळीतले स्थान, नातेवाईकांमध्ये स्थान, अशा सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो आणि आपण जे संकल्प जाहीर करतो ते जर पूर्ण केले नाही तर त्यामुळे आपल्या प्रतिष्ठेला धोका पोहचतो म्हणजेच संकल्प करताना प्रतिष्ठा ही सुद्धा प्रेरणाच असते. त्यासाठी हा विचार होणे आवश्यक आहे. म्हणजेच आपण जे काही संकल्प करतो ते जाहीर करणे आवश्यक आहे आणि फायद्याचा सुद्धा आहे.

भ्रष्टाचार मुक्ती अभियानास सहकार्य करणे थोडक्यात भ्रष्ट मार्गाने काम करून न घेणे.

रस्त्यावर वाहन उभे करून अडथळा निर्माण न करणे.

कार्यक्रमात डी.जे. सारखे वाद्य वाजवून ध्वनी प्रदूषण करणे टाळायला हवे.

वृक्षतोड करणे टाळावे त्याऐवजी वृक्षारोपण करावे. एक तरी झाड लावण्याचा आणि जगण्याचा संकल्प करावा. पाण्याचा योग्य वापर करणे आणि अनावश्यक वापर करण्याचे टाळावे.

स्त्री भ्रूणहत्या, स्त्री अत्याचार विरोधात अभियानास मदत करणे, प्लास्टिक पिशव्यांचा किंवा हानिकारक प्लास्टिक चा वापर न करणे.लव्हजिहाद, धर्मांतरणा सारख्या गोष्टीवर वक्ष ठेवून जागृती करणे

सार्वजनिक जागी कचरा करणे, गुटखा पुड्या टाकणेआणि अस्वच्छता करणे टाळायला हवे.

कुठलेही व्यसन न करणे.


याप्रकारे हे जे सामाजिक जाणीव मनात ठेवून करायचे संकल्पन ते प्रत्येकाने करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यामुळे आपल्यालाही आणि संपूर्ण समाजालाही त्यापासून काही धोका पोहोचू शकत नाही. चांगले कार्य करणाऱ्या संस्थेला काही आर्थिक मदत करता आल्यास ती करावी. अनेक सेवाभावी संस्था आहेत,आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या निराधार मुलांना सांभाळून त्यांचे राहण्याचा शिक्षणाचा खर्च करून बऱ्याच संस्था समाजात चांगले कार्य करत आहेत, यातील अनेक मुल मुली आज उच्च शिक्षण घेत आहेत. त्यांना आर्थिक मदत करणे किंवा संस्थेला एक दिवसाचे अन्नदान, त्यांना ड्रेस,पुस्तके, वगैरे साठी मदत आपण करू शकतो. तर आपल्यालाही चांगले कार्य केल्याचे आत्मिक समाधान मिळते.

राजकीय नेत्यांनी त्यांच्या स्वागताचा होणारा हार, गुच्छ, होर्डिंग, यावर होणारा मोठा खर्च टाळावा. नवीन वर्षात शेतीमालास चांगला भाव मिळण्यासाठी, बेरोजगारी कमी करून महागाई कमी करण्याचा संकल्प करावा. युवाशक्तीचा वापर फक्त निवडणुकीच्या कामी करणे बरोबरच त्यांच्या बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी विशेष लक्ष द्यायला हवे.

राजकीय नेत्यांनी बोलताना मोजकेच आणि सगळ्यांच्या हिताचे बोलावे ज्यामुळे वाद विवाद होतील आणि सामाजिक ऐक्य बिघडेल असे पातळीसोडून बोलू नये. अशा प्रकारचे वक्तव्य करू नये. सध्या अर्वाच्य, पातळी सोडून बोलणे खूपच होते. त्यावर सुध्दा विचार करायला हवा आहे.

स्त्रियांवरील अत्याचार कमी होत नाहीत,शाळांमधून शिक्षकांकडून होणारे लैंगिक अत्याचार थांबायला हवे.राज्यात त्यासाठी महिला आयोग आहे परंतु त्यांच्याकडून फारशी कामे होत नाहीत आणि त्यामुळे त्याविषयी मोठ्या प्रमाणावर नाराजी आहे, याविषयी विचार करुन कार्यवाही व कारवाई होणे आवश्यक आहे.

वर्षाच्या शेवटच्या महिन्याचे काही दिवस हे आत्मपरीक्षणाची असतात, त्यादृष्टीने गतवर्षी आपण मनात काय योजिले होते कुठले संकल्प केले होते, याचे खरंच आत्मपरीक्षण करायचे असते, आणि झालेल्या चुका या वर्षी परत होणार नाही हीसुद्धा खबरदारी घ्यावयाची असते. म्हणून नववर्षाच्या सुरुवातीला संकल्प तर आपण करतो पण वर्षभरात त्याची पूर्तताही करायची असते याची जाणीव सतत मनात असू द्यावयाची असते...तरच संकल्प पूर्ती होईल.



गतवर्षाची गोळाबेरीज करुन जे जे चांगले होते ते ठेवून वाईट होते त वजा करून, नवा संकल्प करून नवीन आशा पल्लवित करू या..!!

सर्वांना येणारे २०२६ हे वर्ष आरोग्यदायी, समृद्धीचे आनंदाचे येवो, हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.... सगळ्यांना शुभेच्छा.!!

दिलीप देशपांडे.
जामनेर. जिल्हा जळगाव.
मोबा.८९९९५६६९१७
dilipdeshpande24gmail.com




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.